# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 208/2023 दिनांक : 27.05.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**देगलुर** :—दिनांक 26.05.2023 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **मटन मार्केट घुमटबेस देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे मटन घेण्यासाठी मटन मार्केट घुमटबेस देगलुर येथे गेले असता त्या ठिकाणी यातील नमुद आरोपी यांने फिर्यादीस थांबवुन तुझा मोठा भाऊ आसीफ याने मला दोन दिवसापुर्वी वडीलांना शिवीगाळ का केलास या कारणावरून मारहान केली होती मी तुझे वडीलांना शिवीगाळ केली नव्हती आता मी तुझी दाखवतो असे म्हणुन त्याचे हातातील सत्तुरने पोटात मारत असतांना फिर्यादीने त्यांचा उजवा हात पुढे केला असता फिर्यादी यांना सत्तुरचा मार लागुन फिर्यादीचे हाताला गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी मोसीन ईस्माईल खुरेशी, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. खाजाबाबानगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 262/**2023 कलम** 307, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मोरे, मो. नं. 9821159844** हे करीत आहेत.

## 2)चोरी :—

**नांदेड ग्रामीण** :—दिनांक 26.05.2023 रोजी चे 02.30 वा. चे सुमारास, **राधाकृष्ण मंगल कार्यालय एमआयडीसी सिडको मंगल कार्यालयाचे हॉलमध्ये ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे राधाकृष्ण मंगल कार्यालय एमआयडीसी सिडको नांदेड येथे जेवणाचे हॉलमध्ये ताट घेवुन रांगेत असतांना पॅन्टच्या पाठीमागील खिशात ठेवलेले नगदी 5000/—रूपये यातील नमुद आरोपीने गर्दीचा फायदा घेवुन ते चोरून त्याच्या मित्राकडे दिले. गर्दीचा फायदा घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी रमाकांत विश्वनाथ सावंत, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. दैटनघाट ता. परळी वैजनाथ जि. बिड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 368/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/113 मुसडे, मो.क्र. 9021745113** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :—

**1)मुक्रामाबाद** :—दिनांक 25.05.2023 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर मौ. सावरमाळ ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आपले पहिली पत्नी दिलेल्या जमिनीच्या मशागतीचे कारणावरून फिर्यादीस यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन आरोपीने खंजरने फिर्यादीचे हातावर मारून गंभीर दुखापत केली तसेच फिर्यादी व साक्षीदार यांना दगडाने, लाथा बुक्याने मारहाण केली. फिर्यादीची पत्नी सोडविण्यास आली असता तिसपण शिवीगाळ व लाथा बुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी विठ्ठल व्यंकटराव सादगीरे, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. सावरमाळ ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरन 129/2023 कलम 326, 324, 143, 147, 148, 149, 323, 504, 506 भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री काळे, मो. नं. 9850072078** हे करीत आहेत.

**2)माळाकोळी** :—दिनांक 24.05.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **घरासमोर मौ. उंडगा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून जुने भांडणाचे कारणावरून फिर्यादी भांडण सोडविण्यास गेला असता त्यास शिवीगाळ करून आरोपीतांनी कत्तीने व दगडाने डोक्यात मारून डोके फोडुन गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी शुभम माधवराव सुरनर, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. अंडगा(उ) ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 63/2023 कलम 326, 324, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2504 कदम, मो. नं. 9881201052** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :—

**किनवट** :—दिनांक 26.05.2023 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **येंदा शिवारातील आरोपीचे शेतालगत असलेल्या पैनगंगा नदीच्या पात्रात ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून जबरदस्तीने वाळुचा ट्रॅक्टर पळवुन वाळु चोरी करून कर्मचार्याना शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी नन्हु गणपतराव कानगुले, वय 49 वर्षे, व्यवसाय नौकरी (मंडळ अधिकारी बोधडी बु.) ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 134/2023 कलम 353, 379, 504, 506, 34, भादवी, सह कलम 5 पर्यावरण संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सावंत, मो. क्र. 9309737394** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 26.05.2023 रोजी चे 13.10 वा. चे सुमारास, **खुदबेनगर चौरस्ता जाणारे रोडचे बाजुस मोहिते मेडीकल समोर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईमबाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 1360/–रूपयासह मिळुन आले. **फिर्यादी पोहेकॉ/2196 विश्वनाथ भुजंगराव इंगळे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 369/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9881475001** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 26.05.2023 रोजी चे 13.10 वा. चे सुमारास, **देगलुर नाका ते माळटेकडी जाणारे रोडवर तांबोळी हॉटेलच्या समोर रोडवर मोकळया जागेत देगलुर नाका ईतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईमबाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 1340/–रूपयासह मिळुन आले. **फिर्यादी पोहेकॉ/2795 शंकर महादु मैसनवाड, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 160/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/108 गुटटे मो. क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**रामतिर्थ :–** दिनांक 26.05.2023 रोजी चे 20.15 वा. चे सुमारास, **मौ. गागलेगाव फाटा लकी हॉटेल ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी /विदेशी दारू किंमती 13120/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करीत असतांना ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/122 व्यंकट सोनबाजी कामपुर्णे, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 82/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/पठाण, मो.नं. 9823027725** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड